# महाराष्ट्र विधानसभा

# दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**शुक्रवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८**

**( सकाळी १०.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे-**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४७१ ते ५१२ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**( सकाळी ११.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत )**

## उपाध्यक्षांची निवडणूक

**( दुपारी १.३० वाजता )**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : (क) महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे मा. राज्यपाल महोदयांना सादर केलेले सन २०११ चा १, सन २०१३ चा १, सन २०१४ चे १०, सन २०१५ चे ४ आणि सन २०१६ चे २ असे एकूण १८ विशेष अहवाल त्यावरील शासनाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचा सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचा सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अहवाल आणि आयोगाच्या वार्षिक लेख्यांवरील महालेखापरीक्षकांचा लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त मंत्री** :

(क) महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसकंल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(ख) सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतचे माहिती पुस्तक सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

(क) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) महिला व बाल विकास मंत्री** :

(क) महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन

२०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अनुक्रमे एकेचाळीसावा व बेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(५) **जलसंपदा मंत्री** : (क) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अलग लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ग) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०१५-२०१६ या कालावधीच्या लेख्यावरील भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचा अलग लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(६) **परिवहन मंत्री** : कोकण रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(७) **पर्यावरण मंत्री** : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(८) **कामगार मंत्री** : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचा सन २०१२-२०१३

व सन २०१३-२०१४ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : लोकलेखा समितीचा सत्तेचाळीसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : सार्वजनिक उपक्रम समितीचा एकोणिसावा अहवाल सादर करणे.**

**पाच : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**सहा : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा दुसरा अनुपालन अहवाल सादर करणे.**

**सात : विधानसभा आश्वासन समितीचा दहावा अहवाल सादर करणे.**

**आठ : महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा नववा व दहावा अहवाल सादर करणे.**

**नऊ : मा.समिती प्रमुख, विधानसभा विशेषाधिकार समिती यांचा प्रस्ताव -**

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

(१) सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.छगन भुजबळ व डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी श्री.महावीर जाधव, पोलीस उपनिरीक्षक, श्रीगोंदा, जिल्हा अहमदनगर यांचेविरुध्द दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

(२) महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचे मा.समिती प्रमुख श्री.अनिल कदम व समितीच्या सन्माननीय सदस्यांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक (सिडको), सहव्यवस्थापकीय संचालक (१) (सिडको), सहव्यवस्थापकीय संचालक (२) (सिडको) यांच्याविरुध्द दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

**दहा : विनंती अर्ज सभागृहास सादर करणे :-**

**श्रीमती दिपिका चव्हाण, वि.स.स.** : **"मौजे मुल्हेर, ता.बागलाण, जि.नाशिक येथील ग्रामीण रुग्णालय सुरु करणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतील.

**अकरा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**बारा : (अ) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १)**

**(१) डॉ. राहुल पाटील, सर्वश्री. सुनिल प्रभू, अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बाळासाहेब थोरात, अमिन पटेल, अस्लम शेख, मो. आरिफ नसीम खान, डॉ. संतोष टारफे, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. त्र्यंबकराव भिसे, कुणाल पाटील, मंगेश कुडाळकर, सुनिल शिंदे, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री. पंकज भुजबळ, छगन भुजबळ, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, जितेंद्र आव्हाड, अनिल कदम, प्रताप सरनाईक, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात यावर्षी पाऊसमान कमी राहिल्याने पोळ कांद्याच्या उत्पादनास मोठा फटका बसणे, पावसाचे आगमन लांबल्याने उन्हाळी कांद्याचे दर मोठया प्रमाणात वाढणे, प्रती क्विंटल सरासरी २१०० रुपयांचा टप्पा गाठणारा कांदा सध्या प्रती क्विंटल १६०० रुपयावर असतांना नवीन कांदा बाजारात न आल्याने साठविलेल्या उन्हाळी कांद्यावर अवलंबून राहावे लागणे, परंतू कांदा साठवणूकीमुळे वजनात घट, निकृष्ट दर्जाचा माल यामुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागणे, असे संकट असतांनाही केंद्र शासनाने कांद्याचे भाव स्थिरिकरण निधी अंतर्गत खरेदी केलेल्या कांद्यासमोर पेच निर्माण होणे, बाजारातील कांद्याची घसरण रोखणे व दरवाढ नियंत्रित ठेवण्यासाठी महानगरात कांदा पुरविण्याच्या उद्देशाने नाफेडच्या मदतीने केंद्र शासनाने नाशिक, नगर, सोलापूर या भागातून माहे एप्रिल ते माहे जून या कालावधीत उन्हाळी कांद्याची केलेली खरेदी, २५ हजार मेट्रीक टन कांदा साठवणूकीसाठी पुरेशा चाळी न मिळाल्याने नाफेडला ११ मेट्रीक टन खरेदीवर समाधान मानावे लागणे, परिणामी कांद्याचे दर आवाक्याबाहेर वाढल्याने व हजारो टन कांदा खराब झाल्याने जनतेला चढ्या दराने कांदा घ्यावा लागत असल्याने त्यांच्यात वाढता असंतोष, शासनाने कांद्याचे वाढते दर आटोक्यात आणून स्वस्त दरात कांदा उपलब्ध करुन देण्याकरिता करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया.''

**(२) सर्वश्री. बच्चू कडू, शिरीष चौधरी, विनायकराव-जाधव-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"करंजे (ता. खानापूर, जि. सांगली) येथील एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची दिनांक ५ नोव्हेंबर, २०१८ रोजी घडलेली घटना, सदर घटनेतील आरोपी राहुल दत्तात्रय माने यानेच दोन वर्षांपूर्वी याच मुलीवर बलात्कार केल्याच्या प्रकरणात त्यांच्यावर खटला सुरु असणे, दोन वर्षांपुर्वी याच गावातील एक शिक्षक व राहुल दत्तात्रय माने याने याच मुलीवर बलात्कार केल्यानंतर पोलिसांनी योग्यरीत्या प्रकरण न हाताळणे, सदर पीडित मुलगी सावरण्याचा प्रयत्न करीत असताना पुन्हा त्याच आरोपींनी या मुलीवर बलात्कार केल्याने सदर मुलीचे जीवन उध्वस्त होणे, सदर प्रकरणी दिनांक ५ नोव्हेंबरला गुन्हा घडूनही दिनांक ९ नोव्हेंबरपर्यंत विटा पोलिसांनी गुन्हा दाखल करून न घेणे, याप्रकरणी विटा पोलीस सातत्याने गुन्हेगारांना सहकार्य करीत असल्याचे स्पष्ट होणे, गावातील नागरिकांसमोर गुन्हेगार फिरत असतानाही पोलिसांनी अटक न करणे, बलात्कारासारख्या गुन्ह्यात विटा पोलीस, पोलीस उप अधिक्षक आदींनी असंवेदनशीलतेने कार्यवाही करून गुन्हेगारांना संरक्षण दिल्याने जनसामान्यांमध्ये पसरलेला संताप, शासनाने याप्रकरणी तातडीने पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची व गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) सर्वश्री. चरण वाघमारे, राजेश काशीवार, ॲड. रामचंद्र अवसरे, सर्वश्री नानाजी शामकुळे, विजय रहांगडाले, डॉ. देवराव होळी, श्री कृष्णा गजबे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यात सर्वाधिक रेती घाट असणे, या रेती घाटातून श्री.सुर्यकांत पाटील या महसूल अधिकाऱ्याच्या संगनमताने अवैध रेती उपसा सुरु असणे, रेती माफियाकडून या अधिकाऱ्यांच्या मदतीने बंद असलेल्या रेती घाटातून रात्रीला जेसीबीने नदीपात्राच्या बाहेर रेती गोळा करून ठेवणे, कार्यवाही करीत असल्याचे भासवून उपविभागीय अधिकाऱ्यांनी आदेश करूनही मुदतीत जप्त केलेल्या रेतीची उचल न करणाऱ्या रेती माफियांना उलट मदत करून कोणताही दंड न आकारता दिनांक ०४/०८/२०१८ च्या लिलावाचे २८८ ब्रास, दिनांक ०६/०८/२०१८ च्या लिलावाचे १२९ ब्रास, दिनांक २१/०६/२०१८ ला मौजा पाचगाव येथे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रक क्र. एम.एच.४० एन ७२१७ मधील ३ ब्रास रेती, तसेच दि. १४/१०/२०१८ ला रीठी गाव मौजे डोकेपार, पाचगाव येथे अंदाजे ३५० ब्रास मुरूम पोकलेन मशीनने उत्खनन केल्याचे जप्ती पंचनामा तयार करणे, परंतु आर्थिक देवाणघेवाण झाल्याने कोणतीही कारवाई न करता शासनाचा अंदाजे ९ लक्ष रुपयाचा

महसूल बुडविणे, दिनांक ३/११/२०१८ रोजी मौजा दहेगाव (ता.मोहाडी) येथे एम.एच. ३४ एल ७९४२, एम.एच. ३६ एल १४२६१ या ट्रक्टरने अवैधरीत्या २ ब्रास मुरुमचे वाहतूक करणाऱ्या ट्रक्टरला पकडून विना कारवाई सोडणे, यामुळे अंदाजे २,५४,००० रुपयांचा शासनाचा महसूल बुडणे, दिनांक २३/१०/२०१८ ला ट्रक क्र. एम.एच. ३६ – एफ ५३३२ परीविक्षाधिन पोलीस उपअधिक्षक यांनी अवैधरित्या पकडणे, त्याची तक्रार होऊ नये म्हणून मोक्यावर उपस्थित नसलेल्या नायब तहसीलदारला धाक दाखवून जबरदस्तीने पंचनाम्यावर सह्या करून पैसे दिले नसल्याने वैध कागदपत्रे बाळगून वाहतूक करणाऱ्या रेती ट्रकवर कारवाई करणे, मौजा वरठी (ता.मोहाडी) येथील मग्रारोहयोच्या मजुरांनी नमुना ४ भरल्यानंतरही १८ दिवसानंतरही काम न देणे, मौजा कान्हळगाव (ता.मोहाडी) येथील गट क्रमांक ३१९/१/२ आराजी ०.८५ हे.आर. जागेची अकृषक परवानगी ९० दिवसात देतांना गट क्र. २१९ चे परवानगी जोडून ३१९/१/२ ला अकृषकची अवैध परवानगी देण्यात येणे, मावा व तुडतुडा नुकसानीचे नुकसान मोबदला हेतुपुरस्सरपणे शेतकऱ्यांना कमी दराने मंजूर करून, उशिराने वाटप करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही."

**(४) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी तालुक्यात प्राथमिक शिक्षकांची १४१ पदे तसेच पन्हाळा तालुक्यात १०१ पदे रिक्त असणे, दोन्ही तालुक्यात अनेक ठिकाणी एकही शिक्षक नसल्याने ग्रामस्थांनी शाळा बंद करणे, दोन्ही तालुके डोंगरी व दुर्गम असल्याने शिक्षकांची इथे काम करण्यास इच्छा नसणे, अनेक शिक्षक नेमणूक झाल्यानंतरही शाळेत हजर नसणे, शासनाच्या आंतर जिल्हा बदलीत कोल्हापूर जिल्ह्यात ८३ नवीन शिक्षकांची झालेली नेमणूक, सदर शिक्षकांना तालुके देत असताना शाहुवाडी व पन्हाळा तालुक्यामध्ये शिक्षणाची नियुक्ती न होणे, नवीन शिक्षकांची नेमणूक होत असताना जिल्हा परिषदेने रिक्त पदांच्या अनुशेषाचा विचार न करणे, नवीन प्राथमिक शिक्षक भरती अजूनही शासनाच्या विचाराधीन नसणे, जिल्हा परिषद स्तरावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षकांचे समायोजन करूनसुद्धा तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्पुरत्या स्वरूपाचे लेखी आदेश काढूनसुद्धा सदर शिक्षक नेमून दिलेल्या शाळांत हजर न होणे, शिक्षकांना शाळा देत असताना मोठ्या प्रमाणावर जिल्हा परिषद सदस्यांचा होणारा हस्तक्षेप, त्यामुळे अजूनही शाहूवाडी-पन्हाळा तालुक्यात शिक्षकांची पदे इतर तालुक्यांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर रिक्त असणे, जिल्ह्यातील माध्यमिक शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या २९ शिक्षकांना प्राथमिक शाळेत समायोजन करण्याची प्रक्रिया सुरु असणे, यामध्ये सुद्धा शाहुवाडी तालुक्यामध्ये ३ शिक्षक तसेच पन्हाळा

तालुक्यामध्ये केवळ २ शिक्षक नेमलेले असणे, ज्या तालुक्यात शिक्षकांची रिक्त पदे तुलनेने कमी आहेत त्या तालुक्याला शिक्षकांची नेमणूक करणे, त्यामुळे शाहुवाडी-पन्हाळा तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिक्षणाचा दर्जा घसरणे, संपूर्ण जिल्ह्यातील शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेवून शाहुवाडी व पन्हाळा तालुक्यातील रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी शिक्षकांचे फेर समायोजन करण्याची असलेली गरज, जिल्ह्यात नव्याने आलेल्या ८३ प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शाळांत अतिरिक्त ठरलेले २९ शिक्षक यांच्या नियुक्त्या तात्काळ रद्द करून शाहुवाडी व पन्हाळा तालुक्यातील रिक्त पदांचा अनुशेष भरून काढण्यासाठी शिक्षकांच्या फेर नियुक्त्या करणे गरजेचे असणे, त्याचबरोबर तात्पुरत्या स्वरूपावर ज्या शिक्षकांना समायोजित केलेले आहे त्यांना सदर शाळांमध्ये हजर होण्याची सक्ती करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**(५) श्री.अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पर्यावरण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सांगली व कोल्हापूर शहरातील सांडपाणी नाल्यातून नदिमध्ये सोडताना दुषित पाणी स्वच्छ करून सोडण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रत्येक वर्षी रु. १२ ते १५ कोटी खर्च करत असणे, याबाबत पर्यावरण विभागाने सदरचे दुषित पाणी स्वच्छ करून नदीत सोडण्याकरिता योजना राबविण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही न करणे, परिणामी रोज सांगली व कोल्हापूर शहरातील लाखो लिटर दुषित पाणी प्रक्रिया न करता नदीत सोडल्याने नदीशेजारील ३ – ४ तालुक्यातील लाखो लोकांना कॅन्सर व अन्य आजारांची झालेली लागण, दुषित पाण्यामुळे शेती विषमय झाल्यामुळे लोकांना कॅन्सर व विविध आजार होणे, सांगली व कोल्हापूर शहरातील नाल्यातील दुषित पाणी थेट नदीमध्ये सोडत असल्यामुळे व पर्यावरण विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे लोकांच्या जीवितास व आरोग्यास निर्माण झालेला धोका लक्षात घेता लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१८ या कालावधीत पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष या नाल्यांना भेट देवून व पाहणी करून यामध्ये असलेल्या त्रुटी त्यांच्या निदर्शनास आणूनही पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून त्याकडे केलेले दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये पसरलेला असंतोष, सदर प्रकरणाची चौकशी करून करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

**(६) सर्वश्री. सुनिल केदार, राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अमर काळे, अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. डी. पी. सावंत, अब्दुल सत्तार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"गोंदिया येथील के.टि.एस. सामान्य रुग्णालयामध्ये सन २०१२-१३ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षात मोठया प्रमाणात करण्यात आलेली औषधी खरेदी, ही खरेदी कागदोपत्री दाखवून सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीमध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक यांनी बनावट देयकाव्दारे लाखो रूपये मंजूर करून केलेला अपहार, या गंभीर प्रकरणाची तक्रार वरिष्ठ अधिकाऱ्याकडे प्राप्त होताच त्यांनी उपसंचालक, आरोग्य विभाग, नागपूर यांना चौकशी करण्याचे दिलेले आदेश, प्रत्यक्ष चौकशीमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार उघडकीस येणे, उपसंचालक यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ आणि दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी चौकशी अहवाल आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय अभियान, मुंबई यांना सादर करणे, या अहवालामध्ये तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रविशेखर धकाते, डॉ.मिलिंद सोनोने, डॉ. देवेंद्र पातुरकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, औषध निर्माण अधिकारी इत्यादी १३ अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा अंतर्गत प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस करणे, तथापि अद्यापही कोणतीच कार्यवाही न होणे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रविशेखर धकाते हे भंडारा येथे जिल्हा शल्य चिकित्सक पदावर कार्यरत असतांना फक्त २० सेंटर मंजूर असतांना व वरीष्ठ अधिकाऱ्यांची तसेच शासनाची कोणतीही परवानगी न घेता ४८ सेंटरवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना शासन तिजोरीतून वेतन देणे, या प्रकरणाची तक्रार होताच भंडारा जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून सदर सेंटर रद्द करणे, मात्र शासनाच्या तिजोरीतून नियमबाहय लाखो रूपयांची उधळपट्टी करण्यात आली असतांनासुध्दा डॉ. धकातेवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यामूळे नागरिकांत पसरत असलेला असंतोष, या गंभीर प्रकरणी तातडीने कारवाई होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.."

**(७) श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील एमआयडीसी विळे-भागाड येथील मेसर्स पोस्को स्टिल महाराष्ट्र प्रा.लि. कंपन्यांमध्ये स्टिल मालाची लोडींग, अनलोडींग, थापी व त्याअनुषंगीक माथाडी स्वरुपाची कामे होत असणे, राज्यातील कंपन्यांमध्ये महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अन्वये स्थापन झालेल्या शासनाच्या मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाची योजना लागू असून कंपनीत चालणारी कामे मंडळाच्या नोंदीत असलेल्या माथाडी कामगारांकडूनच करुन घेणे बंधनकारक असताना या कंपनीने बाहेरील अनोंदीत कामगारांची नियुक्ती करुन त्यांच्याकडून कामे करुन घेणे, या कंपनीत बाहेरील ३०० कामागारांकडून माथाडी कामगारांची कामे करुन घेण्यात येत असल्यामुळे कंपनीने केलेला नियमभंग, या कंपनीत एकूण १९०० कंत्राटी कामगार असून पेरोलवर फक्त ५०० कामगारांची नोंद करणे, त्यामुळे माथाडी कामगारांवर होत

असलेला अन्याय, या कंपनीतून झिंक रसायन मिश्रीत पाणी त्यावर प्रक्रिया न करता नदीत सोडत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचा पोत बदलला असून शेतकऱ्यांच्या पिकावर होत असलेला विपरीत परिणाम व पिण्याचे पाणी सूध्दा दुषीत झालेले असणे, यासंदर्भात मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, कळंबोली यांनी कंपनीच्या मॅनेजींग डायरेक्टर तसेच वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानगांव यांना दिनांक १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी पत्र देऊनसूध्दा त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, त्यामुळे तेथील शेतकऱ्यांत, नागरीकांत व माथाडी कामगारांत पसरलेले चिंतेचे वातावरण, या कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**(८) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, अमित साटम, अतुल भातखळकर, ॲड. आशिष शेलार, श्री. समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"एपीएम टर्मिनल (द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायगड) व्यवस्थापनाने कोणतीही पूर्वसूचना न देता बेकायदेशीररित्या ९९ प्रकल्पग्रस्त कामगारांना कामावरून कमी केले असणे, २७ वर्षापूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून सदर जमिनीमध्ये कंपनीची झालेली उभारणी, सदर कंपनीमुळे शेतकऱ्यांचे उपजिवीकेचे शेती हे एकमेव साधन नष्ट झाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना कंपनीमध्ये सामावून घेतले असणे, परंतू कामगारांना कामावरून काढून टाकल्यामुळे त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीची आलेली वेळ, कामगारांना पूर्ववत कामावर घेण्यासाठी वारंवार बैठका व पत्रव्यवहार करून सुध्दा कंपनीच्या व्यवस्थापनाकडून सातत्याने केली जाणारी टाळाटाळ, उक्त कारणास्तव प्रकल्पग्रस्त कामगारांमार्फत कंपनी व्यवस्थापनाविरोधात दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ पासून बेमूदत आमरण उपोषण सुरू असणे, आमरण उपोषणातील चार कामगारांची तब्येत खालावली असून एमजीएम हॉस्पिटल, वाशी येथे दाखल केलेल्या एका कामगाराची प्रकृती अतिशय चिंताजनक असणे, उपोषण सुरू होवून अनेक दिवस होवूनसुध्दा कामगारांना न्याय मिळण्यासाठी कंपनी व्यवस्थापन तसेच शासनाकडून कोणतीच कार्यवाही झाली नसणे, त्यामुळे कामगारांमध्ये पसरलेला असंतोष, शासनाने तातडीने लक्ष घालून ९९ प्रकल्पग्रस्त कामगारांना तातडीने पूर्ववत कामावर घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

**तेरा : शासकीय विधेयके :**

**(१) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०१८.

---

**(२) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-**

**सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**(३) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(अ)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री वसंतराव चव्हाण, कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री अमित झनक, हर्षवर्धन सपकाळ, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - विजयभूमी विद्यापीठ, रायगड विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डी.पी.सावंत, श्रीमती निर्मला गावीत, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री वसंतराव चव्हाण, कुणाल पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - विजयभूमी विद्यापीठ, रायगड विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७९ - विजयभूमी विद्यापीठ, रायगड विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(४) विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे :-**

**सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न**

**(५) विचार खंडश: विचार व संमत करणे :-**

**(अ)** (क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.भारत भालके, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.जयकुमार गोरे, संग्राम थोपटे, अमित झनक, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.विरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ – महाराष्ट्र (लोकसेवकांची) विसंगत प्रमाणातील मालमत्ता सरकारजमा करण्याबाबत विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ब) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८० - दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

---

**(गुरुवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**चौदा : श्री. सुनिल प्रभू, ॲड. आशिष शेलार, श्री. अजय चौधरी, ॲड पराग अळवणी, सर्वश्री सदा सरवणकर, अतुल भातखळकर, प्रताप सरनाईक, ॲड राज पुरोहित, सर्वश्री. सुनिल शिंदे, अमित साटम, प्रकाश फातर्पेकर, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. मंगेश कुडाळकर, सुनिल राऊत, मंगलप्रभात लोढा, रमेश लटके, संजय केळकर, तुकाराम काते, योगेश सागर, सुभाष भोईर, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, तृप्ती सावंत, डॉ.भारती लव्हेकर, सर्वश्री रूपेश म्हात्रे, सरदार तारासिंह, प्रकाश सुर्वे, अशोक पाटील, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री. संजय पोतनीस, शांताराम मोरे, अमित घोडा, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"मुंबई शहर व उपनगरांचा सन २०१४ ते २०३४ या वीस वर्षाचा विकास आराखडा व विकास नियंत्रण नियमावली तयार करुन मुंबई महापालिकेने राज्य शासनाकडे पाठविणे, मुंबईतील ठप्प झालेली विकास कामे सुरु होण्यासाठी विकास आराखडयास त्वरित मान्यता

देण्याची आवश्यकता, शासनाच्या प्रस्तावित गृहनिर्माण धोरणांतर्गत म्हाडा वसाहतींना चार चटई क्षेत्रफळ (एफएसआय) अनुज्ञेय करण्यात येणे, जुन्या गाळेधारकांना पुनर्विकासात किमान ३५.०० चौरस मीटर चटई क्षेत्रफळ (फंजिबल शिवाय) अनुज्ञेय करण्यात येणे, फक्त भाडेकरु राहत असलेल्या इमारतीतील भाडेकरुंना ५० टक्के अधिक प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र अनुज्ञेय करणे, आशिया खंडातील सर्वात मोठया धारावी (मुंबई) येथील झोपडपट्टीच्या विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी, मुंबईतील केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या तसेच निमशासकीय व खाजगी जमिनीवरील झोपडपट्टीचा व धोकादायक इमारतीचा विकास, मुंबईतील बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकास, मुंबईतील झोपडपट्टीवासियांना २६९ चौ. फूट ऐवजी ३०० चौ. फूट क्षेत्रफळाची घरे देण्याची घोषणा, मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींचा पुनर्विकास व या वसाहतीमधील ५० वर्षापूर्वीच्या मल:निसारण वाहिन्या त्वरित दुरुस्त करण्याची आवश्यकता, पुनर्विकास प्रकल्पांमधून विकासकांनी भाडेकरुंना देण्यात येत असलेले धनादेश न वटणे, पुनर्विकासाची अनेक कामे सुरु न होणे अथवा अनेक वर्षापासून अर्धवट स्थितीत पुनर्विकास पडून असणे, महानगरपालिका क्षेत्रातील ५०० चौ. फूटापर्यंच्या घरांना मालमत्ता कर माफ करण्याचा व ५०० ते ७०० चौ. फूटांच्या घरांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याबाबतचा ठराव मुंबई महानगरपालिकेने व ठाणे महानगरपालिकेने मंजूर करुन महापौरांच्या स्वाक्षरीने मा. मुख्यमंत्री महोदयांना पाठविणे, तथापि आयुक्तांनी या संदर्भात नगरविकास विभागाकडे आपले अभिप्राय न कळविणे, मुंबईतील काही लोकप्रतिनिधीनी नगरविकास विभागाच्या सचिवांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी लेखी निवेदन देऊन महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाला तातडीने अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्याची मागणी करणे, वांद्रे-पूर्व येथील शासकीय अधिकारी-कर्मचारी यांना दिलेल्या निवासस्थानांच्या जागेवर मालकी हक्काने निवासस्थाने बांधून देण्याची मागणी, राज्य शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची दिवाळीपूर्वी लागू करण्याबाबत शासनाने केलेली घोषणा, सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी त्वरेने लागू करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी.''

**(गुरुवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**पंधरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, गणपतराव देशमुख, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, छगन भुजबळ, बाळासाहेब थोरात, शशिकांत शिंदे, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, जितेंद्र आव्हाड, प्रा.वर्षा गायकवाड, सर्वश्री अब्दुल सत्तार, गोपालदास अग्रवाल, मो. आरीफ नसीम खान, सुनिल केदार, दिलीप सोपल, मधुकरराव चव्हाण, ॲड यशोमती ठाकूर, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री अमिन पटेल, डी.एस.अहिरे, राहुल मोटे, हसन मुश्रीफ, बसवराज**

**पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, भारत भालके, बाळासाहेब पाटील, वसंतराव चव्हाण, संग्राम थोपटे, रणजित कांबळे, डॉ.संतोष टारफे, सर्वश्री दिपक चव्हाण, प्रदिप जाधव-नाईक, कुणाल पाटील, हनुमंत डोळस, काशीराम पावरा, हर्षवर्धन सपकाळ, विजय भांबळे, राहुल बोंद्रे, वैभव पिचड, अमर काळे, अमित झनक, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, कु.प्रणिती शिंदे, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री भाऊसाहेब कांबळे, शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावीत, सर्वश्री अस्लम शेख, ॲड. त्र्यंबकराव भिसे, जयकुमार गोरे, नितेश राणे, सिध्दाराम म्हेत्रे, पांडुरंग बरोरा, कालिदास कोळंबकर, विश्वजित कदम, संदिप नाईक, डॉ. मधुसूदन केंद्रे, सर्वश्री राहुल जगताप, नरहरी झिरवाळ, पंकज भुजबळ, सुरेश लाड, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री मकरंद पाटील, बबनराव शिंदे, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. डी.पी. सावंत, बसवराज पाटील, अमित देशमुख, ॲड के.सी. पाडवी, श्री. सुरुपसिंह नाईक, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :**

"मागील चार वर्षाच्या काळात सुमारे २.५० लाख कोटीपेक्षा अधिकचे कर्ज घेऊन देखील विविध योजना राबविण्यात शासनाला आलेले अपयश, मेक इन इंडिया व मॅग्नेटिक महाराष्ट्रच्या माध्यमातून २० लाख कोटीची गुंतवणूक आणि ५० लाख नोकऱ्या या घोषणेनुसार किती बेरोजगारांना रोजगार मिळाला यासंबंधीची अधिकृत माहिती उपलब्ध नसणे, परिणामी गरीब व गरजू व्यक्तींना कोणताही फायदा न होणे, प्रत्यक्षात विकास कामे न करता १२ हजार कोटीचा अनाठायी केलेला खर्च, बुलेट ट्रेनचा राज्याला फायदा मिळण्याची शक्यता नसताना त्याच्यासाठी सुरु असलेला आटापिटा, समृध्दी महामार्ग, बुलेट ट्रेन, मेट्रो सारखे प्रकल्प सामान्य माणसाच्या माथी मारण्याचा प्रयत्न होत असल्याचे कॅग तसेच वित्त आयोगाच्या अहवालात नमूद करणे, समृध्दी महामार्गाच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीवर टाकलेला बोजा व त्यातून कंत्राटदार, शासकीय अधिकारी व मूठभर व्यावसायिकांचे होणारे कल्याण, परिणामी इतर विभागाच्या अत्यावश्यक योजनांना लावलेली कात्री, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम न मिळाल्याने पैशाअभावी अर्ध्यावर शिक्षण सोडण्याची आलेली वेळ, सौर ऊर्जेसाठी मोठया प्रमाणात खर्च होऊन देखील राज्यावर महागडी वीज खरेदी करण्याची आलेली वेळ, मुद्रा योजनेच्या माध्यमातून बनावट कागदपत्रांच्या आधारे २२ हजार कोटीचे कर्जवाटप केल्याचे उघडकीस येणे, तथापि कर्जाची वसुली करण्यासाठी जिल्हाधिकारी आणि बँका यांचे कोणतेही नियंत्रण नसणे, त्यामुळे मुद्रा योजनेतून वाटप केलेल्या कर्जाबाबतची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, ठाणे महानगरपालिकेकडून विकासकांच्या हितासाठी दुसरे ठाणे निर्माण करण्याचा सुरु असलेला प्रयत्न, त्यातच घनकचरा विभागात सुरु असलेले गैरप्रकार, ठाणे शहरातील रतनशी प्रेमजीसारख्या धर्मादाय संस्थांनी स्वत:च्या फायद्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने ठाणे शहरातील १२०० एकर जमिनीची अत्यल्प दराने केलेली विक्री, आदिवासी भागात कुपोषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून ते रोखण्यास शासनास आलेले अपयश, सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे ही योजना अमलात आणून १९ लाख घरे उभारण्याची केलेली घोषणा, तथापि प्रत्यक्षात केवळ १८७२ घरे उभारण्यात आल्यामुळे प्रशासनाच्या संथ गतीने

योजना पूर्णत्वास येण्यास २०५० साल उजाडण्याची निर्माण झालेली स्थिती, मुंबईतील ७ मेट्रो प्रकल्प, मोनो प्रकल्प, नागपूर व पुणे मेट्रोच्या कामाच्या संथ गतीमुळे पुढील १० वर्षातही हे काम पूर्ण होण्याची शक्यता नसणे, अनुसूचित जाती व नवबौध्द भूमिहिनांसाठी असलेल्या दादासाहेब गायकवाड योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेला विलंब, एस.टी. महामंडळाकडून मोठ्या प्रमाणावर झालेली भाडेवाढ, राज्यावरील कर्जाचा डोलारा वाढणे, दरडोई ३५ हजाराचे कर्ज असणे, शासनातील विविध विभागाची भ्रष्टाचाराची प्रकरणे पुराव्यासह उघडकीस आणूनही कारवाई करण्यात जाणीवपूर्वक होत असलेला विलंब, पोलीसांवर होणारे वाढते हल्ले तसेच अनुसूचित जाती/जमातींवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ, अशा सर्वच क्षेत्रात शासन अपयशी ठरल्यामुळे राज्याची पत घसरली असून, राज्य दिवाळखोरीत जात असल्याची निर्माण झालेली स्थिती, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## अशासकीय कामकाज

## ( बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास )

**सोळा : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८१ – महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ – **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ८२ – महाराष्ट्र देवता, संत, राष्ट्रपुरुष, धर्मग्रंथ यांचे विडंबनावर नियंत्रण विधेयक, २०१७ – **श्री.मनोहर भोईर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक १९- महाराष्ट्र अनुसूचित जाती उप-योजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, नियतवाटप आणि वापर) विधेयक, २०१८- **ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २०- महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २१- महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक,

२०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २२- महाराष्ट्र जमीन महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) (सुधारणा) विधेयक, २०१८- **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २३- नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.अमित साटम, वि.स.स. यांचे.**

(८) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २४- महाराष्ट्र जनजाती उप-योजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, नियतवाटप आणि वापर) विधेयक, २०१८- **ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स. यांचे.**

(९) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक २५ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे.**

(१०) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५२ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.मनोहर भोईर, वि.स.स.**

(११) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५३ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०१८ - **श्री.अमीत साटम, वि.स.स.**

(१२) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ५४ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०१८ - **श्री.जयंत पाटील, वि.स.स.**

(१३) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८१ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१८ - **श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स.**

(१४) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८२ - महाराष्ट्र वेश्म मालकी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१८ - **श्री.राहुल कुल, वि.स.स.**

(१५) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८३ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी निवृत्ती वेतन देण्याबाबत विधेयक, २०१८ - **श्री.प्रकाश आबिटकर, वि.स.स.**

(१६) सन २०१८ चे वि.स.वि.क्रमांक ८४ - महाराष्ट्र राज्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०१८ - **श्री.प्रकाश आबिटकर,**

**वि.स.स.**

**सतरा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(दिनांक २० जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु पुढे ढकलण्यात आलेले अशासकीय ठराव) (क्रमांक १ ते ४)**

(१) **श्री. गणपतराव देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५९**

"राज्यामध्ये कोटयवधी रुपये खर्च करुन ग्रामीण भागामध्ये शासनाने तयार केलेल्या अनेक प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना वर्षानुवर्षे बंद असल्याने त्या योजना चालू करण्याच्या दृष्टीने शासनाला उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या १५ सदस्यांची समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **प्रा.राहुल बोंद्रे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २४५**

"शेतक-यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतक-यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. वैभव नाईक, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१**

"कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) पात्रातून कोयना धरणाचे वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांना पुरविण्यात येवून पाण्याची समस्या/ दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने त्याचप्रमाणे वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यातून उचलून (लिफ्टिंग) गुरुत्वाकर्षण शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री. मनोहर भोईर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २**

"राज्यातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता या किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

# " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१८

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.